# पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांचे कार्यालय,

मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,औरंगाबाद- ४३१ ००१.

# महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ०५ दिनांक २८ एप्रिल २०१५ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ हा संपुर्ण राज्यासाठी लागु केलेला आहे. त्याच अनुषंगाने गृहविभाग,महाराष्ट्र शासनाने दिनांक १० जुलै,२०१५ रोजी सदरच्या अध्यादेशाचे प्रयोजनार्थ त्यांचे अधिनस्त असलेल्या कार्यासनांमार्फत तसेच, पोलीस आयुक्त कार्यालये, पोलीस अधिक्षक कार्यालये व त्यांच्या अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयामार्फत मात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा,नियत कालमर्यादा,पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि व्दितीय अपील प्राधिकारी या बाबी अधिसुचित केलेल्या आहेत. सदरचा अध्यादेश लागु केलेल्या दिनांकापासून म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ च्या कलम ३(१) नुसार गृहविभागाने अधिसूचना लागू केलेली आहे.

२. सदर प्रकरणांमध्ये प्रधान सचिव (विशेष) गृहविभाग,महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ व अधिसुचनांप्रमाणे अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयामार्फत मात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि व्दितीय अपील प्राधिकारी या बाबी निर्देशीत करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने पोलीस आयुक्तालय,औरंगाबाद शहर यांचे अधिनस्त असलेल्या पोलीस आयुक्त कार्यालय (खुद्द), पोलीस उपआयुक्त, परिमंडळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस ठाणे व इतर शाखा यांना अध्यादेशांची अंमलबजावणी करण्याचे हेतुने खालील प्रमाणे लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपील प्राधिकारी यांचे बाबी सुचित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिका-याचे पदनाम | प्रथम अपिल अधिका-याचे पदनाम | व्दितीय अपिल अधिका-याचे पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ०१ | तक्रारदारास प्रथम खबरी अहवालाची (एफआयआर) प्रत पुरविणे. | नोंदणी नंतर तात्काळ. | पोलीस ठाणे अंमलदार. | पोलीस निरीक्षक (पो.ठाणे अधिकारी) | सहाय्यक पोलीस आयुक्त, |
| ०२ | ध्वनिक्षेपकाच्या (लाऊडस्पिकर) परवाना देणे. | कार्यालयीन कामकाजाचे ०३ दिवस. | पोलीस निरीक्षक (पो.ठाणे अधिकारी) | सहाय्यक पोलीस आयुक्त, | पोलीस उप आयुक्त परिमंडळ |
| ०३ | मनोरंजनाचे कार्यक्रमांना ना हरकत परवाना देणे. | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | प्रशासकिय अधिकारी | सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन. | पोलीस उप आयुक्त मुख्यालय |
| ०४ | सभा,संमेलन,मिरवणूक, शोभायात्रा इ. करीता परवानगी देणे. | कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवस. | पोलीस निरीक्षक (पो.ठाणे अधिकारी)/ सहा.पोलीस आयुक्त विभाग, सहा.पोलीस आयुक्त,विशेष | सहा.पोलीस आयुक्त/पोलीस उप आयुक्त, परिमंडळ/ पोलीस उप आयुक्त, मुख्यालय. | पोलीस आयुक्त. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | शाखा. | | |
| ०५ | विदेशी नागरिकांना निवासासाठी मुदतवाढ देणे/ ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवस | पोलीस निरीक्षक, विशेष शाखा. | सहा.पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस उप आयुक्त मुख्यालय |
| ०६ | भारत देशात परत येण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवस | पोलीस निरीक्षक, विशेष शाखा. | सहा.पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस उप आयुक्त मुख्यालय |
| ०७ | पारपत्र पडताळणी साठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक, विशेष शाखा. | सहा.पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस उप आयुक्त मुख्यालय |
| ०८ | निम शासकिय, खाजगी संस्था इत्यादी मध्ये नोकरी करीता वर्तणुक व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे ३० दिवस | पोलीस निरीक्षक, विशेष शाखा. | सहा.पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस उप आयुक्त मुख्यालय |
| ०९ | पेट्रोल पंप, गॅस एजन्सी, हॉटेल, बार इत्यादी करीता ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | प्रशासकिय अधिकारी | सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन. | पोलीस उप आयुक्त मुख्यालय |
| १० | शस्त्र परवान्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | प्रशासकिय अधिकारी | सहाय्यक पोलीस आयुक्त, प्रशासन. | पोलीस उप आयुक्त मुख्यालय |
| | वरिल अ.क्र.०९ व क्र.१० साठी शासनाने निर्गमित केलेल्या अधिसुचनांमध्ये सदरचे काम हे विशेष शाखा यांचे अधिनस्त दर्शविण्यात आले आहेत. या घटकात प्रत्यक्षात नमुद कामे ही कार्यालयाच्या परवाना कक्षा कडे आहे. | | | | |
| ११ | भारतीय नागरिकांना परदेशात जाण्यासाठी पोलीस अनुमती प्रमाणपत्र देणे. (शिक्षणासाठी/नोकरीसाठी व्हीसा) | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक, विशेष शाखा. | सहा.पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस उप आयुक्त मुख्यालय |
| १२ | तिबेटीयन नागरीकांना भारत देशात परत येण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे १५ दिवस | पोलीस निरीक्षक, विशेष शाखा. | सहा.पोलीस आयुक्त, विशेष शाखा | पोलीस उप आयुक्त मुख्यालय |

३. वरिल नमुद प्रमाणे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ च्या कलम ३ (१) नुसार गृहविभागाने अधिसूचनां लागू केलेली आहे. सदर अधिसुचनांची अंमलबजावणी ही तात्काळ अंमलात आणावी. त्याप्रमाणे त्यांचे अधिपत्याखालील सर्व पोलीस ठाणे अंमलदार / पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी / शाखा प्रभारी अधिकारी/ सहाय्यक पोलीस आयुक्त/ पोलीस उप-आयुक्तांनी याबाबत प्राथम्याने सुचना देण्यात याव्यात. त्याच प्रमाणे सदरच्या अधिसुचनां/ कायदयाचे अनुषंगाने सदरची माहिती ही पोलीस ठाणे/कार्यालयाचे प्रथम दर्शनी भागामध्ये सर्वसामान्य नागरिकांना याची माहिती होण्यासाठी आवश्यक ते फलक लावण्यात यावेत.

४. सदर प्रकरणी शासनाने लागु केलेल्या महाराष्ट लोकसेवा हक्क अध्यादेश,२०१५ या कायदयाचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी, त्याच प्रमाणे सदर प्रकरणांत उल्लंघन झाल्यास कायदयानुसार कार्यवाही करण्यात येईल याचीही कृपया नोंद घेण्यात यावी. सदर प्रकरणात महाराष्ट लोकसेवा हक्क अध्यादेश- २०१५ हा कायदा महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकतेस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

******

# अधिसूचना

गृह विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ३२.
दिनांक १० जूलै २०१५

क्रमांक : एचडीओ-०२५१/प्र.क्र.३७/आस्था-१ : महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.५) च्या कलम ३(१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार, गृह विभाग, याद्वारे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ गृह विभाग, मंत्रालय (खुद्द) कार्यालयाच्या अधिनस्त कार्यासनांमार्फत तसेच, पोलीस आयुक्त कार्यालये, पोलीस अधिक्षक कार्यालये व त्यांच्या अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयांमार्फत पात्र नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशि अधिकारी, प्रथम आणि व्दितीय अपील प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसुचित करीत आहे :-

## परिशिष्ठ

| अ.क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिका-याचे पदनाम | प्रथम अपिल अधिका-याचे पदनाम | व्दितीय अपिल अधिका-याचे पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | विदेशी कलाकारांच्या सहभागास परवानगी | अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन ७ दिवस | कक्ष अधिकारी, गृह विभाग | अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ | उप सचिव/सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२. |
| २ | कागदपत्रांचे साक्षांकन | कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवस | कक्ष अधिकारी, गृह विभाग | अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ | उप सचिव/सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२. |
| ३ | भारतीय नागरिंकांसाठी नोरी (NORI) प्रमाणपत्र | अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन ३३० दिवस | कक्ष अधिकारी, गृह विभाग | अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ | उप सचिव/सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२. |
| ४ | पोलीस क्लिअरन्स प्रमाणपत्र | अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन ३० दिवस | कक्ष अधिकारी, गृह विभाग | अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ | उप सचिव/सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२. |
| ५ | विदेशी नागरीकांचे नागरीकत्वाचे प्रस्ताव केंद्र शासनास पाठविणे | परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कार्यालयीन | कक्ष अधिकारी, गृह विभाग | अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ | उप सचिव/सह सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | कामकाजाचे ३० दिवस | | | |
| ६ | तक्रारदारास प्रथम खबरी अहवालाची (एफ.आय.आर) प्रत पुरविणे. | नोंदणीनंतर तात्काळ | पोलीस ठाणे अंमलदार | पोलीस ठाणे अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी/सहाय्यक पोलीस आयुक्त |
| ७ | ध्वनिक्षेपकाचा (लाऊडस्पीकर) परवाना देणे | कार्यालयीन कामकाजाचे ३ दिवस | पोलीस ठाणे अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी/सहाय्यक पोलीस आयुक्त | अपर पोलीस अधिक्षक/पोलीस उपायुक्त |
| ८ | मनोरंजनाचे कार्यक्रमांना ना-हरकत परवाना देणे | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | कार्यालयीन अधीक्षक/ प्रशासकिय अधिकारी | पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय)/सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय/प्रशासन) | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त (मुख्यालय) |
| ९ | सभा, संमेलन, मिरवणूक, शोभायात्रा इ.करीता परवानगी देणे | कार्यालयीन कामजाचे ७ दिवस | पोलीस ठाणे अधिकारी/उपविभागीय पोलीस अधिकारी/पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय | उपविभागीय पोलीस अधिकारी/अतिरिक्त पोलीस अधीक्षक | पोलीस अधीक्षक |
| | | | पोलीस ठाणे अधिकारी/सहा.पोलीस आयुक्त/सहा.पोलीस आयुक्त, मुख्यालय | सहाय्यक पोलीस आयुक्त/पोलीस उपायुक्त/पोलीस उपायुक्त, मुख्यालय | अतिरिक्त पोलीस आयुक्त/पोलीस सहआयुक्त |
| १० | विदेशी नागरिकांना निवासासाठी मुदतवाढ देणे/ना-हरकत प्रमाणपत्र देणे | कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेष शाखा/पोलीस निरीक्षक, विशेष शाखा | पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय)/सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेषशाखा | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त, विशेषशाखा |
| ११ | भारत देशात परत येण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे | कार्यालयीन कामकाजाचे ७ दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेषशाखा/पोलीस निरक्षक, विशेष शाखा | पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय)/सहायक पोलीस आयुक्त, विशेषशाखा | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त, विशेषशाखा |
| १२ | पारपत्र पडताळणी साठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेषशाखा/पोलीस निरीक्षक, विशेष शाखा | पोलीस उप अधिक्षक, मुख्यालय/सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेषशाखा | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त, विशेषशाखा |
| १३ | निमशासकिय, खाजगी संस्था इ.मध्ये नोकरीकरीता वर्तणूक व चारित्र्य | कार्यालयीन कामकाजाचे ३० दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेषशाखा/पोलीस निरीक्षक, विशेषशाखा | पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय/सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेषशाखा | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त, विशेषशाखा |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | पडताळणी प्रमाणपत्र देणे | | | | |
| १४ | पेट्रोल पंप, गॅस एजन्सी, हॉटेल, बार इ.ना-हरकत प्रमाणपत्र देणे | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक, जिल्हा विशेषशाखा/पोलीस निरीक्षक, विशेषशाखा | पोलीस उपअधीक्षक, मुख्यालय/सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेषशाखा | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त, विशेषशाखा |
| १५ | शस्त्र परवान्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र देणे | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेषशाखा/पोलीस निरीक्षक, शस्त्र परवाना | उपविभागीय पोलीस अधिकारी/सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेषशाखा | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त, विशेषशाखा |
| १६ | भारतीय नागरीकांना परदेशात जाण्यासाठी पोलीस अनुमती प्रमाणपत्र देणे.(शिक्षणासाठी/ नोकरीसाठी प्रवेशपत्र (व्हीसा) | कार्यालयीन कामकाजाचे २१ दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेषशाखा/पोलीस निरीक्षक, विशेषशाखा | उपविभागीय पोलीस अधिकारी/सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेषशाखा | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त, विशेषशाखा |
| १७ | तिबेटीयन नागरीकांना भारत देशात परत येण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | कार्यालयीन कामकाजाचे १५ दिवस | पोलीस निरीक्षक जिल्हा विशेषशाखा/पोलीस निरीक्षक, विशेषशाखा | पोलीस उपअधीक्षक मुख्यालय/सहाय्यक पोलीस आयुक्त, विशेषशाखा | पोलीस अधीक्षक/पोलीस उपायुक्त, विशेषशाखा |

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**